# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रार
## क्र. रामाआ/तक्रार/२१७/२०२३/अहिल्यानगर

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| अॅड. केशव साहेबराव राजेनिंबाळकर,<br>रा.निवारा बिल्डींग, सहयोग नगर, मु.पो.ता.जि.बीड-४३११२२. | लेखाधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अहिल्यानगर यांचे कार्यालय, जुन्या पंपिंग स्टेशनसमोर, भुतकरवाडी, अहिल्यानगर, ता.जि.अहिल्यानगर-४१४००३. |

**सुनावणी दिनांक-०९/०६/२०२५**

तक्रारदार यांनी दि.०१/०३/२०२३ रोजीच्या अर्जान्वये, "द्वितीय अपिल क्रमांक २५९२/२०२०/अहमदनगर सदर प्रकरणी आपण दिलेल्या निर्णयान्वये, मला माहिती अथवा कोणताही पत्रव्यवहार सदर विभागाकडून झाला नाही. तरी मा. आयुक्त माहिती यांनी सदर विभागावर कोर्टाचा अवमान केलेबाबत रितसर कार्यवाही करुन मला माहिती मिळणेबाबत आदेशीत करावे ही विनंती. तसेच संबंधितांवर दंडात्मक कारवाई करुन तक्रारदार यांना नुकसानभरपाई मिळावी.", असे कारण नमूद करुन कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि.०९/०६/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी – तक्रारदार अनुपस्थित असुन तत्कालीन जन माहिती अधिकारी ऑनलाईन उपस्थित आहेत.

३. तक्रारदार यांनी त्यांच्या दि.१७/०९/२०२० रोजीच्या मुळ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"सन-२०१७ ते माहिती मिळेपर्यंत या कालावधीतील आपल्या कार्यालयामध्ये वर्षनिहाय लेखापरिक्षण अहवाल(आक्षेप पुर्तता नोंदवहीसह) आक्षेप पुर्तता केल्याची वर्षनिहाय पुराव्यानिशी माहिती तसेच वर्षनिहाय दप्तर तपासणी अहवाल यांची माहिती छायांकित साक्षांकित करुन मिळावी."

४. आयोगाने, द्वितीय अपिल क्र.२५९२/२०२०/अहमदनगर संदर्भात दि.२२/११/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीअंती पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

"विद्यमान जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १७/०९/२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी १५ दिवसांच्या आतील तारीख व वेळ कळवावी. अवलोकनानंतर अपिलार्थीस त्यातील कागदपत्रांच्या काही प्रती हव्या असल्यास तशी यादी घेऊन व्यक्तीश: सशुल्क माहिती पुरवावी."

५. सुनावणी दरम्यान सादर केलेला युक्तिवाद व प्रस्तुत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, उपस्थित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अहिल्यानगर यांनी दि. ०५/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये "राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक येथे सदर प्रकरणी दिनांक २२/११/२०२२ रोजी दुपारी ४:०० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर ऑनलाईन सुनावणीदरम्यान मा.राज्य माहिती आयोगाने या कार्यालयास विषयांकित माहिती सशुल्क पुरविणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यामुळे वर नमुद माहितीसाठी छायांकित प्रतीसाठी रु.३१६+ टपालखर्च ८०=३९६ रुपये इतके शुल्क चलन, धनाकर्षाद्वारे शासनखाती अथवा रोख या कार्यालयास जमा करावे. सदर शुल्क प्राप्त झाल्यानंतर आपणास तात्काळ विषयांकित माहिती पुरविली जाईल," असे अपिलार्थी यांना कळविले आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी संबंधित प्राधिकरणास सादर केलेल्या अवलोकनासाठीच्या दि.१३/१२/२०२२ च्या पत्राच्या अनुषंगाने अपिलार्थी हे स्वत: अवलोकनासाठी उपस्थित राहीले नाहीत.

६. सुनावणी दरम्यानचा युक्तिवाद व प्रस्तुत नस्तीवरील कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, द्वितीय अपिल क्र.२५९२/२०२० संदर्भात आयोगाने पारीत केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने, आयोगाचे आदेश पारीत होण्यापूर्वीच संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती कार्यवाही केलेली आहे मात्र तक्रादार हे कागदपत्र अवलोकनासाठी उपस्थित राहीले नाहीत. सदर सुनावणीस तक्रारदार अनुपस्थित असल्याने त्यांना माहितीमध्ये कोणतेही स्वारस्य असल्याचे दिसून येत नाही.

सबब, प्रस्तुत तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्र.२१७/२०२३/अहिल्यानगर निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

20 NOV 2025

जावक क्र. ८०९६